# Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Aksharbharati (Part- 4): Chapter 16.1- व्युत्पत्ती कोश




For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com, 52, Shilpa Nagar, Somalwada Nagpur - 440015
Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888, **Website:** https://www.indcareer.com

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-aksharbharati-part-4-chapter-16-1-vyutpatti-kosh/

# Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Aksharbharati (Part- 4): Chapter 16.1- व्युत्पत्ती कोश

Class 10: Marathi Aksharbharati Chapter 16.1 solutions. Complete Class 10 Marathi Aksharbharati Chapter 16.1 Notes.

## Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Aksharbharati (Part- 4): Chapter 16.1- व्युत्पत्ती कोश

Maharashtra Board 10th Marathi Aksharbharati Chapter 16.1, Class 10 Marathi Aksharbharati Chapter 16.1 solutions

**प्रश्न 1.**

टीप लिहा.

व्युत्पत्ती कोशाचे कार्य

उत्तर:

वाचन करताना अनेक वेगवेगळे शब्द डोळ्यांखालून जातात, काही शब्द लक्ष वेधून घेतात. हे शब्द कसे तयार होत असावेत याची उत्सुकता निर्माण होते. मग अशावेळेस त्या शब्दाची निर्मिती कशी झाली हे पडताळण्यासाठी व्युत्पत्ती कोश उपयोगी पडतो. व्युत्पत्ती कोश शब्दाचे मूळ रूप दाखवतो. इतकेच नव्हे तर त्यातील विस्तार संदर्भ, उच्चारातील बदल व फरक दाखवतो. शब्दांची उत्पत्ती पाहणे, उच्चार जाणून घेणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी क्रिया आहे. एकाच शब्दाचे वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये वेगवेगळे अर्थ असतात, हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उदा. धूळ चारणे; खरे पाहता धूळ चारणे व फसवणे हे दोन अर्थ आहेत. वेगवेगळ्या संदर्भानुसार ते ते अर्थ जुळवले जातात. व्युत्पत्ती कोशातून उच्चारातील बदलांचे कारण स्पष्ट होते. अर्थातील स्पष्ट केलेला बदल अभ्यासता येतो, व्युत्पत्ती कोशातून एखादया शब्दाची अन्य कोणी मांडलेली व्युत्पत्ती सांगून ती योग्य की अयोग्य हे ही कळते. भाषेचे कालिक स्वरूप स्पष्ट करणे हे व्युत्पत्ती कोशाचे प्रमुख कार्य आहे.

**प्रश्न 2.**

खालील मुद्यांच्या आधारे एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)

उत्तर:




१९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव संमेलनात मंजूर करण्यात आला. सर्वांच्या मतानुसार हे निर्मिती कार्य कृ.पां.कुलकर्णी यांच्यावर सोपविण्यात आले. बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली. तसेच सर्वांच्या सहकार्यामुळे १९४६ साली 'मराठी व्युत्पत्ती कोशाचे' पहिले प्रकाशन झाले.

प्रश्न 3.

पाठाबाहेरची उदाहरणे शोधून खालील कृती करा.




उत्तर:

(i) शब्द अनेक, अर्थ एक

| | शब्द अनेक | अर्थ एक | वेगवेगळ्या संदर्भात वापर |
|---|---|---|---|
| (i) | वात, पवन, मरुत, समीर, अनिल | वारा | पवनचक्की, वातचक्र |
| (ii) | नीर, तोय, जल, उदक, जीवन, आप | पाणी | पाणकाठी, पाणचट, जलसंचय, पाणबुडी, उदकपात्र, रेलनीर |
| (iii) | मृत्तिका, मृदा, पृथ्वी मत्तिका | माती | मातकट, मातेरे, मातीमोल |
| (iv) | अधिकार, पदवी, काम नेमणूक | हुद्दा | हुद्देदार, अधिकारी, पदवीधर, पदवीदान, नेमणूककक्ष |
| (v) | कसब, कौशल्य, युक्ति | हुन्नर | कौशल्यपूर्वक, युक्तिशाली, हरहुन्नरी |
| (vi) | हकीकत, वृतान्त, आशय, युक्ति, हिशेब | मजकूर | हिशेबनीस, आशयपूर्वक, वृतान्तलेखन |
| (vii) | अश्व | घोडा | घोडदौड, घोडमुंजा, घोडचूक, घोडनवरा, अश्वलायन, घोडेस्वार |

**(ii)** शब्द एक, अर्थ अनेक

एकच शब्द वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळे अर्थ धारण करतो.

| | शब्द एक | वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळे अर्थ |
|---|---|---|
| (i) | स्नेह-तेल, चरबी सारखा पदार्थ | स्नेह-मैत्री, प्रेम.<br>स्नेहपूर्वक निमंत्रण केले आहे. |
| (ii) | खाट-चारपाई, पलंग | खाट धरणे-आजीबाईंनी खाट धरली.<br>(आजारी पडल्या व अंथरूणाला खिळल्या) |
| (iii) | धूळ-धुळीने भरलेले | धूळ चारणे-पराभव करणे.<br>क्रिकेटमध्ये भारताने श्रीलंकेला धूळ चारली. |
| (iv) | तार-धागा, दोरा | तारणे-रक्षण करणे.<br>देव तारी त्याला कोण मारी. |
| (v) | घट - भांडे, घडा, मडके | घट बसणे-देवीचे घट बसले.<br>घटका भरणे - तिच्या शेवटच्या घटका भरल्या होत्या.<br>घटणे - कमी होणे-वाळूचे डोंगर घटले.<br>घटस्फोट - काडीमोड-त्यांचा घटस्फोट झाला. |

प्रश्न **4.**

टिपा लिहा**.**

(i) शब्द तयार होण्याचे विविध प्रकार.

(अ) भाषेत बदल होण्यामागे बऱ्याचदा सुलभीकरणाची अर्थात सोपे करण्याची प्रवृत्ती असते.

उदा.

जसे अग्निपासून अग्नि व नंतर आग हा सोपा शब्द तयार झाला.

(आ) कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषिक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते. त्यावरून शब्द तयार होतात.

उदा.

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | तुण्ड | तोंड |
| कन्नड | तुप्प | तूप |
| अरबी | इत्र | अत्तर |

(इ) आपलाच शब्द थोडेसे रूप बदलून इतर भाषांमध्येही वापरला जातो.

उदा.

दिवाळी हा शब्द मूळ संस्कृत शब्द दीपावलि पासून आला आहे.

| संस्कृत | बंगाली | हिंदी | पंजाबी | गुजराती | सिंधी |
|---|---|---|---|---|---|
| दीपालि | दिउयाली | दिवाली | दिवाली | दिवाळी | डिआरी |

प्रश्न **5.**

‘काळाप्रमाणश ‘काळाप्रमाणे शब्दाच्या स्वरूपात, त्यांच्या अर्थात, त्यांच्या परस्पर संबंधात बदल होतात’ हे सोदाहरण स्पष्ट करा**.**

उत्तरः

काळाप्रमाणे, पिढ्यांप्रमाणे बोलण्याची भाषा, त्यांचे अर्थ बदलत जातात. आपले आजी-आजोबा बोलत असलेली भाषा, आई बाबा बोलत असलेली भाषा आपली व आपल्या भावंडांची भाषा यात तफावत असते. मित्रांच्या समुहातील भाषा, ही अगदी भिन्न असते.

उदा.

आजी म्हणते, “आज माझे मामजी येणार आहेत”.

आई म्हणते, “आज माझे सासरे येतील”.

मुलगी म्हणते, “आज माझे इन लॉज येणार’.

मित्रांमध्ये – ‘आज सगळ्या सिनीअर सिटीझन्स चे गेट टुगेदर

आहे’. एकच बातमी विविध शब्दयोजनेनी विविध लोकांकडून

सांगितली जाते. नवऱ्याच्या वडिलांसाठी मामंजी. सासरे, इन

लॉज, दादा, बाबा, डॅडी असे अनेक शब्द वापरात येतात.

प्रश्न **6.**

पाठाबाहेरची उदाहरणे शोधून खालील कृती करा**.**

उत्तरः




प्रश्न **7.**

व्युत्पत्ती कोशातून खालील शब्दांची व्युत्पत्ती शोधून लिहा**.**

उत्तरः

**(i) प्रावीण्य**

प्रवीण - (विशेषण) - हुषार, चतुर

सं - प्र + वीणा - वीणा वाजविण्यात कुशल. या शब्दात लक्षण आहे. कौशल्याने काम करणारा तो प्रवीण व कामात कौशल्य ते प्रावीण्य. अशा अर्थाचा हा शब्द आहे.

**(ii) वीज** - वीज (स्त्री), संस्कृत - विद्युत्, (प्रा) - विज्जु (पुं), विज्जुआ.

**(iii) चिल्लर** - स्त्री. मोड, नाश (लक्षणा)

द्रा. कान. चिलवान् = रकमेवरील खुर्दा, चिल्लर = लहानपणा, लघुत्व, कान. चिल्हे, चिल्रे - लहान.

**(iv) गुपचूप** - अ. गप्प

संज्ञा - गुंफचुप (द्विधातुसंयोग)

गुपितें (नरूस्व २१९)

व्युत्पत्ती कोश पाठपरिचय

इयत्ता नववीमध्ये आपण विश्वकोशाची ओळख करून घेतली. कोणत्याही शब्दाचे वेगवेगळे संदर्भ विश्वकोशातून मिळू शकतात हे आपण अनुभवले. हे शब्द तयार कसे होतात किंवा हे शब्द तयार कसे झाले असावेत, हे अनुभवण्यासाठी व्युत्पत्ती कोश पाहणे गरजेचे आहे. व्युत्पत्तीकोश पाहण्याची गरज कळावी व व्युत्पत्ती कोश अभ्यासण्याची सवय लागावी हा हेतू 'व्युत्पत्ती कोश' या पाठातून दिसून येतो.



We have studied about the world dictionary in Std. IX. We have seen how we can get different references for any word from the world dictionary. How have these words come into being? To figure this out, it is necessary to refer to the etymological dictionary. To recognize the need for, and to get habituated to the etymological dictionary is the aim of this lesson.

व्युत्पत्ती कोश शब्दार्थ

- व्युत्पत्ती कोश – शब्दांची घटना व – (etymology, उगम, शब्दांचे – derivative)
  मूळ त्यांच्या
  उगमाची माहिती
  असणारा कोश
- कोपरा – कोनाडा – (corner)
- सतार – एक तंतूवाय – (a string instrument)
- भिन्न – वेगळा – (different)
- नोंद – टिपण – (note)
- अपरिहार्य – टाळता न येणारे – (unavoidable)
- वाच्यार्थ – शब्दश: अर्थ – (the literal meaning)
- लक्ष्यार्थ – गर्भितार्थ, वाच्यार्थाहून भिन्न असा लाक्षणिक अर्थ – (implication, connotation)
- कुतूहल – जिज्ञासा – (curiosity)
- लघुरूपे – घनरूप – (abbreviation)
- बागडणे – आनंदाने खेळणे – (play happily)
- आर्थिक सहकार्य – (financial support)
- प्रकाशन – प्रकाशित करण्याची क्रिया – (publication)
- विणकर – कपडे विणणारा – (weaver)
- माग – कापड विणण्याचे लाकडी यंत्र – (handloom)

- द्विदल धान्य – (dicotelydonous crop)

IndCareer

# Maharashtra Board Solutions Class 10 Marathi Aksharbharati


Part 1

- Chapter 1- तू बुद्धी दे
- Chapter 2.1- संतवाणी अंकिला मी दास तुझा-संत नामदेव
- Chapter 2.2- संतवाणी योगी सर्वकाळ सुखदाता-संत एकनाथ
- Chapter 3- शाल
- Chapter 4- उपास
- Chapter 4.1- मोठे होत असलेल्या मुलांनो...

Part 2

- Chapter 5- दोन दिवस
- Chapter 6- चुडीवाला
- Chapter 7- फूटप्रिन्टस
- Chapter 8- ऊर्जाशक्तीचा जागर
- Chapter 8.1- जाता अस्ताला

Part 3

- Chapter 9- औक्षण
- Chapter 10- रंग साहित्याचे
- Chapter 11- जंगल डायरी
- Chapter 12- रंग मजेचे रंग उदयाचे
- Chapter 12.1- जगणं कॅक्टसचं

Part 4

- Chapter 13- हिरवंगार झाडासारखं
- Chapter 14- बीज पेरले गेले
- Chapter 15- खरा नागरिक
- Chapter 16- स्वप्न करू साकार
- Chapter 16.1- व्युत्पत्ती कोश

# About About Maharashtra State Board (MSBSHSE)

The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or MSBSHSE (Marathi: महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ), is an **autonomous and statutory body established in 1965**. The board was amended in the year 1977 under the provisions of the Maharashtra Act No. 41 of 1965.

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education (MSBSHSE), Pune is an independent body of the Maharashtra Government. There are more than 1.4 million students that appear in the examination every year. The Maha State Board conducts the board examination twice a year. This board conducts the examination for SSC and HSC.

The Maharashtra government established the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, also commonly referred to as Ebalbharati, in 1967 to take up the responsibility of providing quality textbooks to students from all classes studying under the Maharashtra State Board. MSBHSE prepares and updates the curriculum to provide holistic development for students. It is designed to tackle the difficulty in understanding the concepts with simple language with simple illustrations. Every year around 10 lakh students are enrolled in schools that are affiliated with the Maharashtra State Board.

# FAQs

Where do I get the Maharashtra State Board Books PDF For free download?

You can download the Maharashtra State Board Books from the eBalbharti official website, i.e. cart.ebalbharati.in or from this article.

Add image

How to Download Maharashtra State Board Books?

Students can get the Maharashtra Books for primary, secondary, and senior secondary classes from here.  You can view or download the Maharashtra State Board Books from this page or from the official website for free of cost. Students can follow the detailed steps below to visit the official website and download the e-books for all subjects or a specific subject in different mediums.

Step 1: Visit the official website *ebalbharati.in*

Step 2: On the top of the screen, select "Download PDF textbooks"

Step 3: From the "Classes" section, select your class.

Step 4: From "Medium", select the medium suitable to you.

Step 5: All Maharashtra board books for class 11th will now be displayed on the right side.

Step 6: Click on the "Download" option to download the PDF book.

Who developed the Maharashtra State board books?

As of now, the MSCERT and Balbharti are responsible for the syllabus and textbooks of Classes 1 to 8, while Classes 9 and 10 are under the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE).

How many state boards are there in Maharashtra?

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, conducts the HSC and SSC Examinations in the state of Maharashtra through its nine Divisional Boards located at Pune, Mumbai, Aurangabad, Nasik, Kolhapur, Amravati, Latur, Nagpur and Ratnagiri.

IndCareer

# About IndCareer

IndCareer.com is a leading developer of online career guidance resources for the Indian marketplace. Established in 2007, IndCareer.com is currently used by over thousands of institutions across India, including schools, employment agencies, libraries, colleges and universities.

IndCareer.com is designed to assist you in making the right career decision - a decision that meets your unique interests and personality.

For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com

52, Shilpa Nagar,

Somalwada

Nagpur - 440015

Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888

**Website:** https://www.indcareer.com